## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
### अर्थ प्रशासन विभाग

कालमर्यादा

### परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/रानिवेयो/ 2282 /२०१७ दिनांक :- 6/3/2017

संदर्भ :-१. शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५
२. शासन निर्णय क्र.अंनियो १००७/१८/सेवा ४, दिनांक ०७.०७.२००७
३. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा ४ दिनांक २१ ऑगस्ट, २०१४
४. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र. ३२/सेवा ४, दिनांक ०६ एप्रिल, २०१५
५. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या (NPS) अंमलबजावणीबाबत दि. ६.११.२०१५ रोजी सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित केलेली कार्यशाळा.
६. उपसचिव (कृषि व पदुम), महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक संकीर्ण १५१५/प्र.क्र. ४४८/६-अे, दिनांक ०७.११.२०१५.

संदर्भ क्र.१ येथे नमूद शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी राज्यात केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ येथे नमूद शासन निर्णयानुसार या योजनेच्या अंमलबजाणीच्या प्रयोजनार्थ राज्य शासन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असाही निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, निधी व्यवस्थापक इत्यादीच्या नियुक्तीबाबत केंद्र शासनाने निर्णय घेतला नसल्यामुळे ही कार्यवाही होईपर्यंत संदर्भ क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयानुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची स्थापना करून त्यांच्या मार्फत सदर योजना राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत सर्व नियंत्रण अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख, प्राचार्य यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र.४ चे शासन निर्णयाव्दारे दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत रूजू झालेल्या ज्या कर्मचा-यांची नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेखाली (DCPS) वर्गणी कपात करण्यात आली आहे, अशा कर्मचा-यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागु करण्यात आली आहे.

तरी दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रूजू झालेल्या सर्व अधिकारी/कर्मचा–यांकडून खालील विहीत नमून्यातील अर्ज तिन प्रतित भरून घेउन दि. ३०.०३.२०१७ पर्यंत या कार्यालयास बिनचुक पोहोचतील अशा रितीने सादर करावेत.

| अ.क्र. | तपशिल | एकुण प्रती |
|---|---|---|
| १. | जोडपत्र–१ (Annexure-S 1)<br>Application for Allotment of Permanent Retirement Account Number (PRAN) | ०३ |
| २. | National Pension System (NPS) Subsriber Registration Form | ०३ |

वरील दोन्ही अर्जापैकी जोडपत्र–१(Annexure-S 1) हे सोबत जोडलेल्या जोडपत्र–२ (Annexure-S 5) (कार्यालयाच्या लेटरहेडवर) सोबत जोडून या कार्यालयास सादर करावे तसेच Subsriber Registration Form स्वतंत्रपणे या कार्यालयास सादर करावेत.

**Note-**

१) ज्या कर्मचा–यांचे या पुर्वीच राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे फॉर्म भरून सादर करण्यात आले असतील त्यांनी पुन्हा फॉर्म भरुन देण्याची आवश्यक्ता नाही फक्त नव्याने रूजू झालेल्या कर्मचा–यांनी **NPS चे प्रप्रत्र भरून या कार्यालयास सादर करण्यात यावेत.**

२) वरीलप्रमाणे जोडपत्र–१ व जोडपत्र–२ हे संदर्भ क्रमांक ४ च्या शासन निर्णयासोबत असून तो शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www-maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

३) Subsriber Registration Form हा https://www.npscra.nsdl.co.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

४) उपरोक्त सर्व फॉर्म भरण्यापूर्वी फॉर्मसोबत असलेल्या सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून काटेंकोर पालन करावे.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमूख कृषि विद्यापीठ,
अकोला

प्रतिलीपी :–

१. नियंत्रण अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख–––––––––––––––––––––
२. प्राचार्य –––––––––––––––––––––––––––
३. मा. कुलसचिव, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहीतीस्तव सादर.